


परळी

समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता...

# संघर्षनेता



https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे

बीड | वर्षे- 10 वे | अंक क्र. 285 | सोमवार दि. 17 नोव्हेंबर 2025 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060


## खा. बजरंग सोनवणे यांनी पक्षाच्या वतीने नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दिपक देशमुख यांचे नाव जाहीर

• प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामिधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामिधून वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन हासिना जब्बार सय्यद आदी नगरसेवक पदाचे उमेदवारही जाहिर







परळी (प्रतिनिधी)- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाची परळी काल पत्रकार परिषद खा. बजरंग सोनवणे यांच्या उपस्थितीत झाली. यावेळी, पक्षाचे निरिक्षक नरेंद्र काळे, प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या दीपक देशमुख,माजी नगराध्यक्ष दिपक देशमुख, जीवनराव देशमुख, उत्तम माने,तालुका अध्यक्ष बाबा शिंदे, अँड.माधव जाधव शहराध्यक्ष सय्यद फिरोज आदींची उपस्थिती होती. दरम्यान यावेळी बोलताना खा.बजरंग सोनवणे यापूर्वीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार कोणाच्या ताब्यात आहे कसा आहे कुणाला सांगण्याची गरज नाही. दरम्यान लोकसभेला सर्वांनी काम केल्याचे कार्यकर्त्यांचे कौतुक खासदार बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केले. यावेळी प्रभाग क्रमांक सहा खुल्या प्रवर्गामधून दीपक रंगनाथ देशमुख, प्रभाग क्रमांक सात खुल्या प्रवर्गामधून वैजनाथ नागनाथ धंपलवार प्रभाग क्रमांक तीन मधून हासिना जब्बार सय्यद नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार पान 3 वर

## भाजपचे कार्यालय कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा व प्रेरणेचे केंद्र बनेल - ना. पंकजाताई मुंडे

➡ छत्रपती संभाजीनगर येथे भाजपच्या कार्यालयाचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते थाटात लोकार्पण




छत्रपती संभाजी नगर ।दिनांक 16।भारतीय जनता पक्षाचा पाया हा संघर्षातूनच उभा आहे. अटलजींनी त्या काळामध्ये "ना हार मे, ना जीत मे, ना भयभीत किंचित में" असे म्हणत ही संघर्षाची बीजं पेरली. त्या संघर्षमय वाटचालीला नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून यश मिळवून देत सुवर्ण सुवर्णकाळ आणला आहे असे प्रतिपादन राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना पंकजाताई मुंडे यांनी केले.

भारतीय जनता पक्षाच्या छत्रपती संभाजीनगर येथील कार्यालयाचे उद्घाटन आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर येथे करण्यात आले. त्यावेळी ना पंकजाताई मुंडे बोलत होत्या. यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे यांनी भारतीय जनता पक्षाच्या संघर्षातून सुवर्णकाळाकडे झालेल्या वाटचालीची थोडक्यात प्रभावी मांडणी केली. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की,भारतीय जनता पक्षाने त्या दशकांमध्ये पक्ष वाढीसाठी मोठा संघर्ष केला. मात्र आज तोच पक्ष संपूर्ण भारतात यशस्वी झालेला आहे. त्या दशकातील पक्ष वाढीसाठी खस्ता खाल्लेल्या सर्व नेत्यांचे हे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खरे करून दाखवले आहे. बिहारमध्येही आपल्याला प्रचंड यश मिळाले आहे. आता कोणतेच राज्य असे राहणार नाही जिथे भाजपाची पूर्ण सत्ता नसेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या माध्यमातूनही भाजपाला तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपद मिळाले आहे. प्रत्येक कार्यकर्त्याचे स्वप्न होते की तिसऱ्यांदा भाजपचा मुख्यमंत्री झाला पाहिजे. देवेंद्र पान 3 वर

## आज ठळक

### शब्दांची 'अमानत' आणि माणुसकीचा 'आधार': नंदकिशोरजी काकाजींच्या नेतृत्वावर अंबेजोगाईचा 'अढळ' विश्वास!



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी अंबेजोगाई नगरापालिकेच्या निवडणुकीत काकाजींचे मोठेपण ठरेल निर्णायक

अंबेजोगाई: राजकारण बदलले, पिढ्या बदलल्या, पण नंदकिशोरजी काकाजी यांच्या नेतृत्वावरील जनसामान्यांचा विश्वास आजही कायम आहे. अंबेजोगाई नगरपालिकेच्या निवडणुकीच्या निमित्ताने हाच 'अढळ विश्वास' पुन्हा एकदा सिद्ध होत आहे. त्यांच्या नेतृत्वाखालील पक्षाला मिळणारे यश केवळ मतांचे नाही, तर त्यांच्या 'वचनाची' आणि 'माणुसकीची' पावती आहे, अशी चर्चा शहरात सुरु आहे.

'माणसांपेक्षा शब्द मोठे असतात' या तत्त्वावर जगणारे काकाजी, त्यांच्या कार्यकर्त्यांसाठी आणि नागरिकांसाठी नेहमीच एक 'आधार' राहिले आहेत. पान 3 वर

## स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत भाजपा क्रमांक एकचा पक्ष; मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे वक्तव्य



छत्रपती संभाजीनगर : विरोधकांनी मतचोरीसारखी धादांत खोटी मांडणी करूनही बिहारच्या निवडणुकीत भाजपा व मित्रपक्षांना घवघवीत यश मिळाले. विरोधकांचा सुफडासाफ झाला, असे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आता महाराष्ट्रातही स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत यश मिळवत भाजपा क्रमांक एकचा पक्ष म्हणून समोर येईल, असा दावा केला. जिथे शक्य असेल तिथे मित्रपक्षांशी युती होईल, परंतु जिथे एकत्र येणे शक्य नाही तिथेही त्यांच्याशी शत्रूसारखे न लढता विरोधात असलेला मित्रपक्ष आहे, याची जाणीव ठेवावी, असा संदेशही त्यांनी कार्यकर्त्यांना दिला.

अतिवृष्टीग्रस्त 70 टक्के शेतकऱ्यांच्या खात्यावर मदतीची रक्कम जमा झाली असून, उर्वरित पैसेही तीन ते चार दिवसांत जमा होतील, अशी माहितीही फडणवीस यांनी दिली. उद्धव ठाकरे यांचा नामोल्लेख टाळून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, आमच्या विरोधकांनी अलीकडेच मराठवाड्याचा दौरा केला. परंतु पान 3 वर

## बिहार निवडणुकीत सपाटून पराभव, काँग्रेसचं पुढे काय होणार? शरद पवारांनी वर्तवलं मोठं भाकीत



बिहार विधानसभा निवडणुकीचा निकाल लागला, यामध्ये एनडीएला मोठं यश मिळालं आहे. भाजप हा या विधानसभा निवडणुकीमध्ये सर्वात मोठा पक्ष ठरला, तर दुसऱ्या क्रमाकांवर नितीश कुमार यांचा पक्ष जेडीयू आहे. बिहारमध्ये एनडीएला स्पष्ट बहुमत मिळालं. तर दुसरीकडे या निवडणुकीत महाआघाडीचा मात्र मोठा पराभव झाला आहे. काँग्रेसला मोठं अपयश आलं आहे. दरम्यान या निवडणुकीत झालेल्या पराभवानंतर राजकीय वर्तुळात काँग्रेसबद्दल समिश्र चर्चा सुरु आहे, यावर आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांनी देखील प्रतिक्रिया दिली असून, त्यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मला जी काँग्रेस समजते ती काँग्रेस संपणारी नाही. गांधी नेहरू यांचा विचार स्वीकारणारी ही काँग्रेस आहे. ती काँग्रेस पुन्हा एकदा एका वेगळ्या स्थितीला पान 3 वर

## राष्ट्रवादीची सुत्रे पंडितांकडे; आमदार क्षीरसागरांचेही आस्ते कदम




नगर पालिका निवडणुकीत नेतृत्वाच्या मुद्द्यावर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये सुरुवातीला उमेदवार निवडीवरुन वाटाघाटीत रस्सीखेच आणि हे प्रकरण तुटण्यापर्यंत ताणल्याने या पक्षाच्या उमेदवारांची यादी अद्याप जाहीर झाली नाही. प्रमुख प्रतिस्पर्धी पक्षाकडून (राष्ट्रवादी काँग्रेस) उमेदवार यादी जाहीर होत नसल्याने राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार संदीप क्षीरसागर यांनीही 'अस्ते कदम चाल' खेळत इच्छुकांना वाट पहायला भाग पाडले आहे. बीडच्या राष्ट्रवादीची सुत्रे आता पंडितांच्या हाती आली आहेत.मागच्या नगर पालिका निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस, संदिप क्षीरसागर यांची काकू नाना विकास आघाडी आणि एमआयएम अशी तिरंगी लढत झाली. नगराध्यक्षपदी डॉ. भारतभूषण क्षीरसागर विजयी झाले तर पक्षाने 21 जागा जिंकल्या. तर, संदीप क्षीरसागर यांच्या आघाडीनेही 18 जागांसह उपनगराध्यक्षपद त्यानंतर शहरातील राजकारणात बिंदुसरा नदीतून भरपूर पाणी वाहून गेले आणि राजकीय समिकरणे बदलली. मात्र, बीडचे राजकारण पान 3 वर

## एकनाथ शिंदेंनी ठाकरेंना पुन्हा डिवचले; 'मी डॉक्टर नाही; पण राजकीय ऑपरेशन सहजपणे करतो'



मी व्यवसायाने डॉक्टर नाही; पण छोटी-मोठी राजकीय ऑपरेशन मी अगदी सहज करून टाकतो. महाराष्ट्राला अपेक्षित असलेलं सर्वांत मोठं ऑपरेशन मी काही वर्षांपूर्वी यशस्वीपणे केलं आहे, असं सांगून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शिवसेना फुटीबाबत पुन्हा एकदा भाष्य करत माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरेंना पुन्हा एकदा डिवचले आहे.

महाबळेश्वर येथील विविध राजकीय पक्षांतील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. त्या प्रवेशानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे (Eknath Shinde) बोलत होते. त्या वेळी त्यांनी शिवसेनेच्या फुटीबाबत केलेल्या वक्तव्याने पुन्हा एकदा राजकीय चर्चेंना उधाण आले आहे.उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, महायुती सरकारच्या (Mahayuti Government) माध्यमातून लोकाभिमुख विकास कामे सुरु आहेत. त्यामुळे इतर पक्षांमधील प्रमुख पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामळे पक्षाची ताकद वाढली असून, महाबळेश्वरमध्ये भगवा नक्कीच पान 3 वर

## परळी नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक प्रथम कर्मचारी प्रशिक्षण यशस्वीपणे संपन्न

• नगर परिषद निवडणूक ; पारदर्शी व भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी समन्वयाने काम करा-निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर

### प्रशिक्षनात मोठ्या संख्येने अधिकारी, कर्मचारी यांची उपस्थिती



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- परळी नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीची प्रक्रिया सुरु झाली असून, राज्य निवडणूक आयोगाने 4 नोव्हेंबर 2025 रोजी कार्यक्रम जाहीर केल्यानंतर आचारसंहिता लागू झाली. नगर परिषद निवडणूकसाठी 79,569 मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत, त्यात 41,023 पुरुष, 38,543 महिला आणि 3 इतर मतदार आहेत. मतदानासाठी 88 केंद्रे निश्चित केली आहेत. मतदान केंद्राकरिता नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व ईतर मतदान अधिकारी यांचे मतदान प्रक्रियाबाबतचे प्रशिक्षण पान 3 वर



• मराठवाडा शिक्षक संघटनेचे संभाजीनगर महानगर सचिव नवनाथ मंत्री यांच्या परळी वैजनाथ येथील निवासस्थानी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे सिनेट मेंबर तथा मराठवाडा पदवीधर मतदारसंघाचे उमेदवार डॉक्टर उमाकांत राठोड सर यांचा शाल पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला

## राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या देशमुख व इतर नगरसेवक पदाचे उमेदवार अतिशय साध्या पध्दतीने उमेदवारी अर्ज दाखल करणार

पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊफड, निरिक्षक नरेंद्र काळे,अँड.माधव जाधव, उत्तम माने,तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, जीवनराव देशमुख व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आदींच्या उपस्थितीत



परळी (प्रतिनिधी)-राज्य निवडणूक आयोगाने मोठा निर्णय घेत, उमेदवारांना समान संधी मिळावी म्हणून 16 आणि 17 नोव्हेंबर या शेवटच्या दोन दिवसांत ऑनलाइन तसेच पारंपरिक (ऑफलाइन) पद्धतीने अर्ज सादर करता येणार आहेत.असा निर्णय घेण्यात आला.परळी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार संध्या देशमुख व इतर नगरसेवक पदाचे उमेदवार अतिशय साध्या पध्दतीने उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. उमेदवार अर्ज दाखल करण्यासाठी मोठ्या प्रमाणात शक्ती प्रदर्शन करून, अवाढव्य खर्च केला जातो. या खर्चाला फाटा देत. कुठले शक्तिप्रदर्शन न करता अकारण खर्च न करता राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचे उमेदवार दिनांक 17 नोव्हेंबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.पक्षाचे प्रदेश सरचिटणीस राजेभाऊ फड, निरिक्षक नरेंद्र काळे, अँड.माधव जाधव, उत्तम माने,तालुकाध्यक्ष बाबा शिंदे, जीवनराव देशमुख व पक्षाचे प्रमुख पदाधिकारी आदींच्या उपस्थितीत भरणार आहेत.दरम्यान , कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहण्याचे आव्हान करण्यात आले आहे. परंतु, कुठलाही गाजावाजा शक्तिप्रदर्शन न करता साधेपणाने परळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सध्या दीपक देशमुख व नगरसेवक 17 नोव्हेंबर रोजी अर्ज करणार दाखल करणार आहेत. ढोल बाज्या, गाड्या वगैरे असे शक्ती प्रदर्शन न करता साध्या पद्धतीने उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत.

# कासारी ( बो ) येथे कुस्त्यांची भव्य दंगल पंचक्रोशितील जनतेने उपस्थित राहाण्याचे गावकऱ्यांचे आवाहन



धारूर ( बाबुराव तिडके ) दरवर्षी प्रमाणे याही वर्षी परंपरेनुसार कासारी ( बो ) येथिल गुरुबाबाची यात्रा सुरु आहे या यात्रे निमित्त सात दिवस नामवंत किर्तण कारांचे किर्तण सेवा होते व शेवटच्या दिवशी काल्याचे किर्तण होऊन महाप्रसाद दिला गेला दि 17 वार सोमवार रोजी आज कासारी ( बो ) येथे भव्य कुस्त्यांचे आयोजन केलेले असुन कुस्तीगिर पैलवान व नागरिकांनी आवर्जुन उपस्थित राहुन या लाल मातीतील मर्दाचा खेळ पाहाण्यासाठी परिसरातील नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन गावकऱ्यांनी केलेले आहे या सप्ताह सह तीन दिवस चालणाऱ्या यात्रेमध्ये लोकनाट्या सांस्कृतिक कार्यक्रम लोककला जागर आदि भरगच्च कार्यक्रमांची रेलचेल असते हि यात्रा गर्दिने फुलून गेलेली असते बाहेर गावी असणारे नौकरदार व लेकमाता गावची यात्रा असल्याने आवर्जुन आपले गाव कासारी ( बो ) येथिल गुरुबाबाच्या यात्रेला आवर्जुन उपस्थित राहातात

# पाली येळंब घाट तांदळ्याचीवाडी या गावांचा श्री बप्पासाहेब घुगे यांना जिल्हा परिषद लढण्यासाठी मोठा पाठिंबा



प्रतिनिधी ( बाबुराव तिडके )पाली जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या येळंबघाट तांदळ्याचीवाडी येथे जिल्हा परिषदेचे संभाव्य उमेदवार श्री बप्पासाहेब घुगे यांनी छोटी बैठक घेतली असता या बैठकीचे रुपांतर सभेमध्ये झाले लोकांच्या अडीअडचणी बप्पासाहेब यांनी जाणुन घेतल्या हा भाग विकासा पासुन कोसो दुर आहे या पाली जिल्हा परिषद सर्कल मध्ये विकासाची गंगा आणुन नंदनवन करायचे असेल तर विकासाची जाण असणारे सर्वांना बरोबर घेऊन चालणारे व आपलेसे वाटणारे श्री बप्पासाहेब घुगे यांच्या पाठीमागे उभे राहुन त्यांना या वेळेस झुकते माप देऊन बप्पासाहेब यांना बीड जिल्ह्याचे मिनी मंत्रालय अससणाऱ्या जिल्हा परिषदेच्या सभाग्रहामध्ये पाठवायचेच हा संकल्प पाली येळंब घाट तांदळ्याचीवाडी येथिल गावकऱ्यांनी केला प्रत्येकाच्या सुःख - दुःखात सहभागी होऊन आधार देणारे बप्पासाहेब घुगे यांची ख्याती असल्याने त्यांची लोकप्रियता वाढताना दिसत असुन पाली सर्कल मधील प्रत्येक गावात त्यांच्या बैठकिला सभेचे स्वरुप आल्याचे दिसत आहे .

# 31 वेठबिगारांची जिल्हाधिकारी व जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जनसाहस यांच्या संयुक्त विद्यमाने सोडवणूक




बीड दि. 16 (जिमाका ) : - जिल्ह्यातील माजलगाव तालुक्यात जबरदस्तीने वेठीबिगारीला जुम्पल्या गेलेल्या 31 जणांची सुटका जिल्हाधिकारी बीड, तसेच जिल्हा निधी सेवा प्राधिकरण आणि जनसाहस यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली

माजलगाव तालुक्यात केली कार्यवाही सर्व नागरिक या आदिवासी समाजाचे असून त्यांच्याकडून गत तीन महिन्यापासून बळजबरीने काम करून घेतल्या जात होते मारहाण व धमकी होत होते अशी तक्रार त्यांच्या नातेवाईकांनी केल्यानंतर न्या आनंद यावलकर प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश बीड विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी बीड व न्या. वाहब सय्यद सचिव जिल्हा विधिसेवा प्राधिकरण बीड यांच्या मार्गदर्शनाखाली 31 कामगारांची सुटका करण्यात आली.

यावेळी गौरव इंगोले उपविभागीय अधिकारी माजलगाव संतोष रुईकर तहसीलदार माजलगाव तत्त्वशील कांबळे अधिकार मित्र जिल्हा विधिसेवा प्राधिकरण बीड, बालक कोळी पोलीस निरीक्षक माजलगाव ग्रामीण पोलीस स्टेशन कामगार कामगार विभागाचे अजय लव्हाळे व इतर कर्मचारी उपस्थित होते.

आज सर्व कामगारांची जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी भेट घेतली त्यांची समस्या जाणून घेतली व त्यांना शासकीय योजना विषयी माहिती दिली मुलांना शिक्षणाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी कोणकोणत्या उपाययोजना कराव्या लागतील यासाठीची माहिती दिली. तसेच सर्व कामगार जळगाव जिल्ह्यातील असल्यामुळे तेथील जिल्हाधिकारी यांच्याशी संपर्क साधून मुलांना शिक्षणाची व्यवस्था करण्यात येईल असे त्यांनी सांगितले

तसेच न्या. वाहब सय्यद यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरण जळगाव यांच्याशी संपर्क साधून या सर्व कामगारांना कायदेविषयक मोफत मधून मिळवून देण्याचे आश्वासित करण्यात आले

# आर्थिक विकासाची गुरुकिल्ली: दीर्घकालीन धोरणे आणि सक्षम नेतृत्व

**डॉ. भारत कऱ्हाड**

आर्थिक विकास हा फक्त आकडेवारीपुरता विषय नसून, तो देशाच्या सामाजिक स्थैर्य, रोजगार निर्मिती, औद्योगिक प्रगती आणि नागरिकांच्या जीवनमानाशी थेट संबंधित आहे. देशाच्या दीर्घकालीन प्रगतीसाठी धोरणात्मक निर्णय घेताना तात्काळ फायद्यापेक्षा दीर्घकालीन परिणामांचा विचार करणे अत्यंत आवश्यक आहे.

आर्थिक धोरणांमध्ये नेतृत्वाचा दृष्टिकोन, शहाणपण, धैर्य, पारदर्शकता आणि नैतिक मूल्यांचा समतोल आवश्यक आहे. जर धोरणे तात्काळ फायद्यावर आधारित असतील, तर ती दीर्घकालीन स्थैर्य साधण्यात अपयशी ठरतात. प्रत्येक आर्थिक निर्णय, योजना किंवा धोरण हा देशाच्या व्यापक विकासाच्या दृष्टिकोनातून विचारलेला असावा.

राजकीय दबाव, विरोधकांचा तणाव किंवा पक्षीय मतभेद हे नेत्यांसमोर येणाऱ्या प्रमुख अडथळ्यांपैकी आहेत. अशा परिस्थितीतही दीर्घकालीन दृष्टिकोन ठेवल्यास निर्णय सक्षमपणे घेता येतात. यशस्वी आर्थिक धोरणे केवळ आर्थिक वृद्धीपुरती मर्यादित नसतात; ती समाजातील विविध घटकांच्या हितासाठी कार्य करतात.

रोजगार हा देशाच्या आर्थिक स्थैर्याचा आणि सामाजिक समरसतेचा मूळ आधार आहे. रोजगार हमी योजना, विशेषतः ग्रामीण आणि शहरी गरीब वर्गासाठी, केवळ तात्काळ रोजगार निर्माण करत नाहीत, तर स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना देतात. अशा योजनांचा दीर्घकालीन परिणाम म्हणजे सामाजिक स्थैर्य, उत्पन्न वितरणात सुधारणा, आणि लोकशाही मूल्यांमध्ये वृद्धी.

रोजगाराच्या माध्यमातून नागरिकांना आत्मनिर्भरता प्राप्त होते, जे सामाजिक कल्याणासाठी अत्यंत आवश्यक आहे. योजना प्रभावी ठराव्यात यासाठी स्थानिक प्रशासन, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, आणि पारदर्शक अंमलबजावणी आवश्यक आहे. फक्त योजना आखणे पुरेसे नाही; ती लोकांपर्यंत पोहोचणे, संसाधनांचा कार्यक्षम वापर, आणि भ्रष्टाचाराचे रोखणे ही देखील महत्त्वाची बाब आहे.

खुल्या अर्थव्यवस्थेमुळे उद्योगांना प्रोत्साहन मिळते, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक आकर्षित होते, रोजगाराच्या संधी वाढतात, आणि उत्पादनक्षमता सुधारते. तथापि, खुल्या बाजारपेठेच्या धोरणांमध्ये संतुलन राखणे गरजेचे आहे. ग्रामीण भागातील लघुउद्योगांसाठी आधारभूत संरचना, ग्रामीण रोजगाराची हमी, शाश्वत विकास, आणि सामाजिक समरसता या बाबींचा विचार केला पाहिजे.

आर्थिक सुधारणा केवळ उद्योग व बाजारपेठेसाठी नाहीत, तर नागरिकांच्या जीवनमानात सुधारणा घडविण्यासाठी देखील महत्त्वाच्या ठरतात. उद्योगांसाठी सुलभ धोरण, कर संरचना सुधारणा, वित्तीय संस्थांचा विस्तार, आणि आर्थिक पारदर्शकता ही उपाययोजना दीर्घकालीन आर्थिक स्थैर्य सुनिश्चित करतात.

आंतरराष्ट्रीय संबंध आणि आर्थिक करार हे आधुनिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य घटक आहेत. व्यापार करार, ऊर्जा आणि औद्योगिक धोरण, आंतरराष्ट्रीय गुंतवणूक प्रोत्साहक उपाययोजना या सर्वांचा उद्देश देशाच्या दीर्घकालीन आर्थिक हितासाठी असावा. आंतरराष्ट्रीय मानकांचे पालन, धोरणात्मक समायोजन, आणि पारदर्शकता या बाबी महत्त्वाच्या ठरतात.

विरोधकांचा दृष्टिकोन समजून घेणे आणि आवश्यकतेनुसार सौम्य संवाद राखणे हे देखील दीर्घकालीन विकासाची हमी देते. राजकीय मतभेद असूनही धोरणात्मक निर्णय देशाच्या हितासाठी असावा. अशा दृष्टिकोनामुळे विरोधकांचा तणाव असूनही धोरणे यशस्वी होतात आणि आर्थिक वृद्धीची गती टिकवता येते.

ऊर्जा धोरणे, पर्यावरणीय संरक्षण, जलसंपदा व्यवस्थापन, आणि शाश्वत औद्योगिक धोरणे ही दीर्घकालीन आर्थिक विकासाची मुख्य कडी आहेत. या क्षेत्रांमध्ये योग्य धोरणात्मक निर्णय घेतल्यास नवे रोजगार निर्माण होतात, सामाजिक असमानता कमी होते, आणि ग्रामीण व शहरी भागात समतोल राखला जातो.

शाश्वत विकासाच्या धोरणांमध्ये नवीन तंत्रज्ञानाचा वापर, ऊर्जा कार्यक्षम उपाययोजना, हरित उद्योगांचा प्रोत्साहन, आणि संसाधनांचा योग्य वापर यांचा समावेश असावा. अशा धोरणांमुळे दीर्घकालीन आर्थिक वृद्धीस चालना मिळते, नागरिकांचा जीवनमान सुधारतो, आणि समाजातील असमानता कमी होते.

धोरण तयार करणे हा फक्त एक टप्पा आहे; त्याची प्रभावी अंमलबजावणी ही खरी कसोटी आहे. यासाठी तज्ज्ञांचा सल्ला, प्रशासनिक समन्वय, संसाधनांचा कार्यक्षम वापर, आणि जनतेपर्यंत पोहोचवण्याची क्षमता आवश्यक आहे. भ्रष्टाचार रोखणे, पारदर्शक प्रक्रिया ठेवणे, आणि लोकांच्या गरजांचा समज ठेवणे ही महत्वाची बाब आहे.

नेतृत्वाच्या संदर्भात, धोरणात्मक निर्णय घेताना धैर्य, शहाणपण, आणि नैतिक मूल्यांचे पालन करणे आवश्यक आहे. राजकीय दबाव, विरोधकांचा तणाव किंवा पक्षीय मतभेद यामुळे निर्णयावर परिणाम होऊ नये. प्रत्येक निर्णय, योजना किंवा धोरण हा देशाच्या दीर्घकालीन हितासाठी असावा.

आर्थिक धोरणे आणि नेतृत्व यामध्ये दीर्घकालीन दृष्टी, पारदर्शकता, नैतिक मूल्यांचे पालन, धैर्य, आणि शहाणपण यांचा समतोल राखणे अत्यंत आवश्यक आहे. रोजगार निर्मिती, औद्योगिक धोरणे, ग्रामीण विकास, आंतरराष्ट्रीय संबंध, ऊर्जा धोरण, आणि शाश्वत विकास या सर्व क्षेत्रांमध्ये दीर्घकालीन दृष्टी ठेवणे गरजेचे आहे.

दीर्घकालीन दृष्टी ठेवणारी धोरणे फक्त आर्थिक वृद्धीपुरती मर्यादित नसतात, तर ती सामाजिक, नैतिक आणि पर्यावरणीय स्थैर्यासाठी देखील अनिवार्य आहेत. अशा दृष्टिकोनातून आर्थिक निर्णय घेतल्यास देशाच्या समृद्धीसाठी आणि नागरिकांच्या हितासाठी योग्य दिशा मिळते, समाजात विश्वास व स्थैर्य निर्माण होते, आणि देशाच्या प्रगतीला गती मिळते.

**डॉ. भारत कऱ्हाड, प्राचार्य, वराडकर महाविद्यालय दापोली, जिल्हा रत्नागिरी.**

# शेअर बाजारातही 'आत्मनिर्भरता'

**• पूर्वी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जोमाने समभागांची विक्री केली की, भारतीय बाजारात गडगडाट होत असे; पण आता तसे घडत नाही.**

पूर्वी विदेशी संस्थात्मक गुंतवणूकदारांनी जोमाने समभागांची विक्री केली की, भारतीय बाजारात गडगडाट होत असे; पण आता तसे घडत नाही. कारण, देशांतर्गत गुंतवणूकदारांनी त्यांची जागा घेतली आहे. भारताच्या शेअर बाजाराचे खरे मालक आता रिटेल आणि म्युच्युअल फंडस् झाले आहेत.

भारतातील शेअर बाजार कोणाच्या इशाऱ्यावर चालतो, या प्रश्नाचे उत्तर काही वर्षांपूर्वीपर्यंत विदेशी गुंतवणूकदारांवर असे होते; पण सप्टेंबर 2025 मध्ये प्रसिद्ध झालेल्या इंडिया ओनरशिप रिपोर्टने आकडेवारीवर आधारित नवे उत्तर दिलं आहे. यावर्षीची सर्वात मोठी आणि ऐतिहासिक बाब म्हणजे पहिल्यांदाच रिटेल गुंतवणूकदारांनी म्हणजेच थेट गुंतवणूक करणाऱ्या आणि म्युच्युअल फंडमार्फत पैसा लावणाऱ्या गुंतवणूकदारांनी मिळून परदेशी गुंतवणूकदारांना मागे टाकले आहे. आता रिटेल गुंतवणूकदारांचा एकत्रित हिस्सा एफपीआयपेक्षा जास्त झाला आहे. दुसरीकडे एफपीआय म्हणजे परदेशी पोर्टफोलिओ गुंतवणूकदारांचा हिस्सा मागील पंधरा वर्षांतील सर्वात नीचांकी पातळीवर आला आहे; पण याच काळात देशांतर्गत म्युच्युअल फंडांनी आणि एसआयपी संस्कृतीने बाजाराला स्थैर्य दिलं आहे. प्रमोटर्सचा हिस्सा स्थिर आहे, तर सरकारचा हिस्सा किंचित कमी झाला आहे. या सर्व घडामोडींचा एकत्रित अर्थ असा आहे की, भारतीय शेअर बाजाराची मालकी आणि दिशा आता हळूहळू भारतीयांच्या हातात येत आहे.

कंपन्यांचे मूळ मालक म्हणजे प्रमोटर्स अजूनही सर्वात मोठे भागधारक आहेत. त्यांच्याकडे एकूण 50.1 टक्के हिस्सा आहे आणि हा हिस्सा गेल्या काही तिमाहींमध्ये जवळजवळ स्थिर आहे. भारतीय प्रमोटर्सकडे 32.2 टक्के हिस्सा आहे, तर परदेशी प्रमोटर्सचा हिस्सा वाढून 8.4 टक्क्यांवर पोहोचला असून तो मागील नऊ तिमाहींमधील सर्वाधिक आहे. यावरुन भारतीय कंपन्यांवरील परदेशी रणनीतिक गुंतवणूकदारांचा विश्वास वाढत असल्याचे दिसते. सरकारचा हिस्सा सध्या 10 टक्क्यांवर असून तो मागील काही तिमाहींमध्ये किंचित घटला आहे. यामागे तीन प्रमुख कारणे आहेत. पीएसयू कंपन्यांमधील ओएफएस म्हणजे ऑफर फॉर सेल, डिसइन्व्हेस्टमेंटच्या योजना आणि खासगी प्रमोटर्सच्या हिश्श्यांत वाढ. गेल्या काही महिन्यांत पीएसयू बँक इंडेक्सने उत्कृष्ट कामगिरी दाखवली असली, तरी सरकारचा हिस्सा कमी झाल्यामुळे नियंत्रण हळूहळू घटत आहे. म्हणजेच गुंतवणूकदारांचा विश्वास टिकून असला, तरी सरकारी हस्तक्षेप मर्यादित होत चालला आहे. परदेशी गुंतवणूकदार म्हणजे एफपीआय यांचा हिस्सा 16.9 टक्क्यांवर आला आहे आणि हा मागील 15 वर्षांतील सर्वात नीचांकी स्तर आहे. एफपीआयचा हिस्सा घटण्याची कारणे स्पष्ट आहेत. जागतिक बाजारातील अनिश्चितता, डॉलरचा भाव, भारतातील व्हॅल्यूएशन, अमेरिका-चीन व्यापार तणाव आणि फेडरल रिझर्व्हच्या धोरणातील अस्थिरता. पूर्वी एफपीआयची विक्री सुरु झाली की, बाजारात मोठी घसरण होत असे; पण यावेळी तसं झालं नाही. कारण, देशांतर्गत म्युच्युअल फंड आणि रिटेल गुंतवणूकदारांनी एफपीआयच्या विक्रीची भरपाई केली आहे. त्यामुळे बाजार स्थिर राहिला आहे आणि घसरण टळली. देशांतर्गत म्युच्युअल फंड म्हणजे डीएमएफ आता भारतीय शेअर बाजाराचे खरे इंजिन ठरले आहेत. डीएमएफचा एकूण हिस्सा 10.9 टक्क्यांवर पोहोचला आहे आणि हा इतिहासातील सर्वाधिक स्तर आहे. सलग नऊ तिमाहींमध्ये डीएमएफने नवा उच्चांक गाठला आहे. दर महिन्याला सरासरी 28,697 कोटी रुपयांचे एसआयपी इनफ्लो होत आहे. या सातत्यपूर्ण भांडवल प्रवाहामुळे बाजारात स्थिरता निर्माण झाली आहे. एसआयपीचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे बाजार घसरला, तरी गुंतवणूक सुरु राहते. त्यामुळे दीर्घकाळात कंपाऊंडिंगद्वारे संपत्ती वाढते आणि बाजाराला एक प्रकारचा बफर मिळतो.

रिटेल, एचएनआय आणि एसआयपीद्वारे गुंतवणूक करणारे भारतीय एकत्रितपणे 18.75 टक्के हिस्सा ठेवतात आणि हा हिस्सा एफपीआयपेक्षा जास्त आहे. हा गेल्या 22 वर्षांतील उच्चांक आहे. रिटेल गुंतवणूक वाढण्यामागे डिमॅट खात्यांमधील प्रचंड वाढ, शून्य ब—ोकरेज ॲप्सचा प्रसार, सोशल मीडियामुळे शेअर मार्केटचे डेमोक्रटायझेशन, एसआयपी संस्कृती आणि युवा गुंतवणूकदारांची नव्या पिढीतील सक्रियता अशी अनेक कारणे आहेत. या बदलामुळे पहिल्यांदाच रिटेल गुंतवणूकदारांनी परदेशी गुंतवणूकदारांना मागे टाकलं आहे आणि हा भारतीय भांडवली बाजारातील दीर्घकालीन संरचनात्मक बदल मानला जातो. एफपीआय प्रामुख्याने फायनान्शियल्स आणि कम्युनिकेशन सर्व्हिसेस या क्षेत्रात गुंतवणूक वाढवत आहेत; पण एनर्जी, मटेरियल्स, इंडस्ट्रियल्स आणि कंझ्युमर स्टेपल्स याबाबत सावध आहेत. डीएमएफ फायनान्शियल्स, कंझ्युमर डिस्क्रेशनेरी आणि मध्यम स्तरावरील हेल्थकेअर कंपन्यांमध्ये जास्त गुंतवणूक करत आहेत, तर एनर्जी आणि मटेरियल्स सेक्टर टाळत आहेत. रिटेल गुंतवणूकदार मात्र मिडकॅप, स्मॉलकॅप आणि मायक्रोकॅप स्टॉक्सकडे आकर्षित झाले आहेत. मोठ्या कंपन्यांमध्ये रिटेल हिस्सा थोडा कमी झाला असला, तरी लहान कंपन्यांमध्ये तो वाढला आहे.

सारांश असा की, भारताच्या शेअर बाजाराचा खरा मालक आता रिटेल आणि म्युच्युअल फंडस् झाले आहेत. भारतीय शेअर बाजार आता परदेशी भांडवलावर अवलंबून न राहता देशांतर्गत बचतीवर चालतो आहे. हा केवळ आकड्यांचा बदल नाही, तर भारताच्या भांडवली बाजाराच्या रचनेतील एक दीर्घकालीन आणि स्थायी परिवर्तन आहे.

# पत्रकारिता देश व समाज घडविण्याचे मोठे माध्यम.

आज भारतातच नाही तर संपूर्ण जगात पत्रकारितेला मोठे महत्व आहे.त्यामुळे पत्रकारितेला "चौथास्तंभ" ही उपमा दिली आहे. जागतीक हालचाली, कळत-नकळत घटना,राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय, जिल्हास्तरीय, गल्लीपासून तर दिल्लीपर्यंत संपूर्ण हालचाली किंवा माहिती 140 कोटी जनतेपर्यंत पोहचवीण्याचे काम पत्रकारितेच्या किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून होत असते.16 नोव्हेंबर 1966 ला प्रेस काउन्सिल ऑफ इंडियाने राष्ट्रीय पत्रकारितेच्या निमित्ताने एक कार्यक्रम घेतला व यामध्ये ठरविण्यात आले की दरवर्षी 16 नोव्हेंबर हा दिवस राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा करण्यात येईल.तेव्हापासुन प्रत्येक वर्षी 16 नोव्हेंबरला राष्ट्रीय पत्रकारिता दिवस म्हणून साजरा केल्या जातो.1920 मध्ये लेखक वाल्टर लिपमैन आणि एक अमेरिकी दर्शनिक जॉन डेवी यांनी लोकतांत्रिक समाजामध्ये पत्रकारितेच्या भुमिकेवर विचार विमर्श प्रकाशित केले होते.पत्रकारिता,जनता आणि नितीनिर्माते यांच्यातील मध्यस्थीतीची भुमिका हाताळीत असते.तेव्हाच आपल्याला समतोलता दिसून येते.या समतोलतेचे दायीत्व पुर्णपणे पत्रकारितेवर अवलंबून असते व पत्रकार आपली जबाबदारी मोठ्या शिताफीने आणि खंबीरपणे पारपाडतो.प्रत्येकबाब जनतेच्या हितासाठी असावी या उद्देशाने प्रत्येक गोष्ट जनतेच्या हितार्थ प्रकाशित केल्या जाते.पत्रकारितेचे अनेक तत्व आहेत लिखाण, समाजातील घडामोडींवर नजर ठेवून माहीती एकत्र करने व ती पत्रकारितेच्या माध्यमातून समाजापर्यंत, सरकारपर्यंत व प्रशासनापर्यंत पोहचवीने.आजच्या आधुनिक युगात वर्तमानपत्र, रेडिओ, दूरदर्शन, वेब-पत्रकारिता, ई-पेपर,सोशल मिडिया यांच्या माध्यमातून पत्रकारितेची भुमिका मोठ्या प्रमाणात बजावली जाते.परंतु काही वाहीण्या स्वतःच्या स्वार्थासाठी कार्य करतात. यामुळे पत्रकारितेची बदनामी होतांना सुध्दा आपण उघड्या डोळ्यांनी पाहिले आहे.परंतु पत्रकारिता तीच असते ज्यामुळे समाजाची जडणघडण मजबूत होते व देशाचा पाया मजबूत होतो यालाच म्हणतात "चौथास्तंभ". पत्रकारिता साधी शैली नसुन कोणत्याही घटनेचा लिखित रुपात वर्णन करण्याकरिता अनेक शैलींचा सटीकतेने उपयोग केल्या जातो यालाच म्हणतात "पत्रकारितेची शैली". पत्रकारितेचे अनेक प्रकार आहेत एम्बुश पत्रकारिता, सेलिब्रिटी पत्रकारिता, कन्वर्जेस पत्रकारिता,गोंजो पत्रकारिता, खोजी पत्रकारिता, नवीन पत्रकारिता, विज्ञान पत्रकारिता, खेळ पत्रकारिता इत्यादी अनेक पत्रकारितेचे प्रकार आपल्याला पहायला मिळतात. पत्रकारांमध्ये नेहमी निष्पक्षता दिसून येते त्यामुळे समाजात खंबीरपणे उभे राहून आपल्या लेखणीच्या माध्यमातून धारधार लीखाण केल्या जाते.यातुनच समाजाला दीशा-निर्देश समजुन येतात.पत्रकारितेच्या लेखणीत एवढी धार असते की तलवारीची धार त्यासामोर नगण्य दिसून येते.कारण संपूर्ण समाजाच्या नैतिकतेची जबाबदारी पत्रकारांच्या लेखणीतून निर्माण होत असते.आज पत्रकारितेच्या माध्यमातून स्थल, जल,वायु यातील घडामोडी जनतेला कळुन येतात. आज मिडियाच्या माध्यमातून व वृत्तपत्र समूहाच्या माध्यमातून राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडी सर्वांना पहायला मिळते.या घडामोडी समाजापर्यंत पोहचविण्याचे काम पत्रकारितेच्या माध्यमातून होत असते.ज्याप्रमाणे सुरंग खोदुन खनीज संपत्ती शोधल्या जाते.त्याचप्रमाणे पत्रकारिता व लेखक आपले विचार समाजापर्यंत पोहचविण्याकरिता एडीचोटीचे प्रयत्न करीत असतो म्हणजेच ऊन,पाऊस, थंडी, सुनामी,खडतडवाट, युद्धजन्य परिस्थितीतील ठिकाणांचा विचार न करता माहिती गोळा करतो व समाजापर्यंत पोहचवितो.तेव्हाच देशातील प्रत्येक व्यक्ती सकाळी वर्तमानपत्राची आतुरतेने वाट पाहत असतो. वर्तमानपत्राला सकाळचा नाश्ता सुध्दा म्हणतात. यावरून स्पष्ट होते की पत्रकारिता व लेखक यांच्यामुळे समाजाची जडणघडण होण्यास मोठी मदत मीळत असते. आज पत्रकारिता कोहीनुरच्या हीऱ्यापेक्षाही जास्त मौल्यवान आहे. आज एका लेखणीतून लाखो-अरबो शब्द बाहेर पडतात म्हणजेच पत्रकारिता ही समुद्रापेक्षाही अफाट आणि मौल्यवान असल्याचे दिसून येते. यातुनच जगात मोलाचा संदेश जात असतो. लेखणीमध्ये व पत्रकारितेमध्ये एवढे तालमेल आहे की संपूर्ण जग लेखणीच्या माध्यमातून पत्रकारितेवर मोठ्या प्रमाणात विश्र्वास ठेवतो.मराठी भाषेतील आद्य पत्रकार बाळशास्त्री गंगाधरशास्त्री जांभेकर यांनी 6 जानेवारी 1832 रोजी "दर्पण" नावाचे पहिले मराठी दैनिक सुरु केले होते. 1832 साली सुरु करण्यात आलेले बाळशास्त्री जांभेकरांचे "दर्पण" हे मराठीतील पहिले वृत्तपत्र होय.यानंतर राजा राममोहन रॉय यांचा "संवाद कौमुदी"टिळक-आगरकरांचा 'मराठा' व 'केसरी' गणेश शंकर विद्यार्थी यांचा 'प्रताप' ही सर्व वृत्तपत्रे आर्थीक तोटा सहन करुन समाज जागृत करण्यासाठी चालविलेल्या जात होती.परंतु आता देशात काही राजकीय पक्षांची वृत्तपत्रेसुध्दा दिसून येतात हि वृत्तपत्रे व वृत्तवाहिन्या आणि दुर्दशन वाहीण्या पत्रकारितेला कलंकित करण्याचे काम करीत असतात.याला केंद्र व राज्य सरकारने कोठेतरी रोखले पाहिजे.आपल्या पुर्वजांनी ज्याप्रमाणे पत्रकारितेची जोपासना केली त्याचप्रमाणे पत्रकारितेची जोपासना सरकार मार्फत व प्रशासनामार्फत व्हायला पाहिजे आणि पत्रकारिता व चौथास्तंभ याला कोणताही आघात पोचनार नाही याची जबाबदारी राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने घेतली पाहिजे. टिआरपी वाढावी म्हणुन काही वाहीण्यांनी पत्रकारीतेची व चौथास्तंभ याची पायमल्ली करण्याचा प्रयत्न केला होता परंतु तो सरकारने हाणुन पाडला. 16 नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसांच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की पत्रकारिता व चौथास्तंभ याला कुठल्याही प्रकारची क्षती होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेण्याची गरज आहे.देशात कुठल्याही परिस्थितीत पत्रकारितेचे व्यवसायीकरण होवु नये व राजकीय दृष्ट्या कोसो दूर राहुन पत्रकारिता आणखी बळकट केली पाहिजे.कारण पत्रकारिता ही प्रसारमाध्यमांचे काम करीत असते यातुनच समाजाला दीशा निर्देश मिळत असते. पत्रकारिता ही वटवृक्षासारखी अफाट आहे कारण समाजातील घटना ऊन,पाउस, थंडी यासारख्या बदलत असतात यापासून संरक्षण करण्याचे काम पत्रकारिता नेहमी करीत असते. पत्रकार आपल्या जिवाची पर्वा न करता आकाश-पाताळ एक करुन निर्भीडपणे कार्य करीत असतो.परंतु गेल्या काही वर्षांपासून असामाजिक तत्वांकडुन पत्रकारांवर हल्ले होत असतांनाचे दिसून येते ही अत्यंत गंभीर व निषेधजनक बाब आहे.अशा असामाजिक तत्वांना प्रशासनाने, केंद्र व राज्य सरकारांनी कोठेतरी रोखले पाहिजे व कठोर कारवाई केली पाहिजे. 16 नोव्हेंबर राष्ट्रीय पत्रकारिता दिवसाला शत-शत प्रणाम करतो.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.9921690779, नागपूर.**

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

संध्याताई देशमुख यांची नावे यावेळी जाहीर करण्यात आली. परळीतून लोकसभेला मोठ्या मताधिक्याने मतदान झाले असून विधानसभेत अपघात वगळता दहशत वगैरे असल्यामुळे चांगले यश मिळू शकले नाही. महाविकास आघाडी म्हणून आम्ही एकत्र निवडणूक लढू, महाविकास आघाडीत कुणी वेगळे लढत असेल तर त्याची मनधरणी करून एकत्रित लढण्याचा प्रयत्न करणारा असल्याचे त्यांनी पत्रकार परिषदेत सांगितले. परळी तालुका व बीड जिल्हा शरद पवारांना मानणारा आहे.जनतेने साथ द्यावी आणि 2 डिसेंबरला मतदान करून निवडून द्यावे, असे आवाहन यावेळी पत्रकार परिषदेत संबोधन करताना खासदार बजरंग सोनवणे केले. यावेळी पत्रकारांच्या अनेक प्रश्नांना त्यांनी समाधानकारक उत्तरे दिली.

---

फडणवीस यांनी ते पूर्ण केले आहे. आज प्रत्येक जिल्ह्यांमध्ये भारतीय जनता पक्षाचे कार्यालय उभी राहत आहेत. ही कार्यालय केवळ कार्यालये न राहता ती निश्चितच प्रत्येक कार्यकर्त्याला ऊर्जा देणारी केंद्रे होणार आहेत. मराठवाड्यातील एक कार्यालय भाजप कार्यकर्त्यांसाठी ऊर्जा केंद्र होणार असून या ठिकाणाहून प्रत्येकाला निश्चित ऊर्जा मिळेल भाजपा रुजवण्यासाठी वाढवण्यासाठी त्या दशकातील आपल्या प्रमोद महाजन असो किंवा मुंडे साहेब असो यांनी पक्षाच्या बाबतीत पाहिलेले स्वप्न पूर्ण होत आहे याचा प्रचंड आनंद होत आहे. येणाऱ्या काळात नगरपालिका पंचायत समिती जिल्हा परिषदांमध्येही देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आपल्याला भरघोस यश मिळवायचे आहे. त्यासाठी सर्वांनी काम कामाला लागावे असे आवाहनही यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले.

---

त्यांच्या दौऱ्यावेळी माणसे गोळा करताना माजी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांची दमछाक झाली. याचा अर्थ लोकांचा तुमच्यावर विश्वास नाही.येथील चिकलठाणा विमानतळासमोर बांधण्यात आलेल्या भाजपच्या विभागीय कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी मुख्यमंत्री येथे बोलत होते. येथील कार्यालय हे विभागीय बैठकीसह प्रदेश कार्यकारिणीची बैठकही येथे आयोजित करण्यासारखे झाले असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले. आजपर्यंत किरायाच्या जागेत पक्षाची कार्यालये चालवली गेली. परंतु 2014 साली केंद्रात भाजपचे सरकार आल्यानंतर गृहमंत्री अमित शहा यांनी पक्षाची स्वत:ची कार्यालये उभारण्याची इच्छा व्यक्त करून त्यासंदर्भाने सूचना दिल्यानंतर या कामांनी वेग घेतला, असेही मुख्यमंत्री म्हणाले.महाराष्ट्राच्या विकासात आणि अन्नधान्यामध्ये स्वयंपूर्ण करण्याचे मोलाचे कार्य दिवंगत मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी केले आहे. त्यांच्यानंतर मात्र, विकासाच्या प्रवाहातील बंजारा समाज बाजूला पडला, असे मत व्यक्त करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वसंतराव नाईक हे आजच्या काळात दुष्काळमुक्तीसाठी राबवण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेचे प्रेरणास्त्रोत असल्याचे सांगितले.बंजारा समाजाला पुन्हा प्रवाहात आणले जात असून, पोहरादेवी तीर्थस्थळाच्या विकासासाठी 700 कोटी रुपये देण्यात आले. पोहरादेवी तीर्थक्षेत्री येणारे नरेंद्र मोदी हे पहिले पंतप्रधान आहेत, असे त्यांनी सांगितले. वसंतराव नाईक यांच्या पूर्णाकृती पुतळ्याच्या अनावरण प्रसंगी ते रविवारी येथे बोलत होते.रझाकाराने अत्याचाराची पराकाष्ठा केल्यानंतर स्वामी रामानंद तीर्थांनी निजामाविरुद्ध संघर्षाचा लढा उभारला. त्या लढ्यातील स्वातंत्र्यसेनानींच्या हाकेला प्रतिसाद देऊन तत्कालीन गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी कारवाई केली. त्यानंतरच मराठवाडा मुक्त झाला, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले. ते स्वामी रामानंद तीर्थ यांच्या अर्धाकृती पुतळ्याच्या अनावरणप्रसंगी बोलत होते.

---

पोहोचणार आहे, असं यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे.असं कधी होत नाही. याच्या आधी महाराष्ट्राचा विचार केला तर 1957 साली महाराष्ट्रात काँग्रेसचा पराभव झाला होता, लोकांनी संयुक्त महाराष्ट्र समितीला निवडून आणलं. त्यावेळी काँग्रेस संपली असं वाटलं. पण असे पक्ष संपत नसतात, तो विचार असतो. मला जी काँग्रेस समजते ती काँग्रेस संपणारी नाही. गांधी नेहरु यांचा विचार स्वीकारणारी ही काँग्रेस आहे. ती काँग्रेस पुन्हा एकदा एका वेगळ्या स्थितीला पोहोचणार आहे, असा विश्वास यावेळी शरद पवार यांनी व्यक्त केला आहेदरम्यान पुढे बोलताना ते म्हणाले की, आमची माहिती वेगळी होती आणि निकाल वेगळा लागला. मात्र लागलेला निकाल स्वीकारायचा असतो. निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजनेसारखी योजना महाराष्ट्रात असो किंवा बिहार त्या ठिकाणी सरसकट महिलांना पैसे देण्यात आले. नगरपालिका निवडणुकीत पैसे वाटप होतात हे आम्ही ऐकले होते, पण सरकारच्या माध्यमातून सबंध महिला वर्गाला 10 हजार देणे हे आम्ही कधी ऐकले नव्हते. याचे काही परिणाम आहेत की नाही हे लोकांनी ठरवावे, असंही यावेळी शरद पवार यांनी म्हटलं आहे..

---

क्षीरसागरांभोवतीच फिरत राहीले. मात्र, या ओढाताणीनंतर बीडची सुत्रे पंडितांकडे आली आहेत. दरम्यान, त्यावेळी राष्ट्रवादीत असलेले जयदत्त क्षीरसागर शिवसेनेत गेले. तर, संदीप क्षीरसागर दोनदा आमदार झाले. डॉ. योगेश क्षीरसागर यांनीही स्विकृत नगरसेवक म्हणून राजकीय प्रवास सुरु करत पुढे वडिलांचा राजकीय वारसा हाती घेत काका जयदत्त क्षीरसागरांपासून दुर होत राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्षपद आणि मागची विधानसभा उमेदवारीही मिळविली. परंतु, कायम क्षीरसागरांना मानणारा माजी नगरसेवकांचा एक मोठा गट त्यांच्यापासून दुरावला.मिळविले.आता होत असलेल्या निवडणुकीत याच माजी नगरसेवकांच्या उमेदवारीवरुन डॉ. क्षीरसागर आणि पक्षात ओढाताण सुरु झाली. अखेरकार शनिवारी डॉ. क्षीरसागर यांनी पक्षाच्या पदाचाही राजीनामा दिला. तत्पुर्वीच बीडची सुत्रे हाती आल्यानंतर पंडितांच्या शिवछत्र निवासस्थानी उमेदवार यादीसाठी तीन दिवसांपासून खलबते सुरु झाली. आमदार विजयसिंह पंडित, माजी आमदार संजय दौंड, जिल्हाध्यक्ष राजेश्वर चव्हाण, बळीराम गवते आदी उमेदवार निवडत आहेत. त्यामुळे राष्ट्रवादीच्या उमेदवारांची यादी जाहीर होण्यास उशिर लागला.प्रमुख प्रतिस्पर्धयांचे उमेदवार जाहीर होत नसल्याने राजकीय खेळी म्हणून आमदार संदीप क्षीरसागर (Sandip Kshirsagar) यांनीही तयार करुन ठेवलेली उमेदवार यादी घोषित केली नाही. मागच्या वेळी आघाडीतून यश आणि दोन्ही आमदारकीवेळी प्रतिस्पर्धयापेक्षा शहरातून अधिक मते मिळाल्याने यावेळी त्यांनाही 'फुल्ल कॉन्फीडन्स' आहे. त्यात आता त्यांच्याकडे प्रमुख नेत्यांचे प्रवेश देखील होत आहेत. मात्र, अगोदर समोरचे कोणते अस्त्र काढतात हे पाहूनच उमेदवारीची त्यांची खेळी आहे.

---

यशस्वीपणे संपन्न झाले. दरम्यान निवडणूक आयोगाच्या सर्व मार्गदर्शक तत्वांचे ततोतंत पालन करुन लोकांचा लोकशाही मुल्यांवरील, निवडणूक प्रक्रीयेवरील विश्वास वृध्दींगत करावा, पारदर्शी व भयमुक्त वातावरणात निवडणूक पार पाडण्यासाठी सर्वांनी दक्ष राहून समन्वयाने काम करावे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी अरविंद लाटकर यांनी केले.

मा. राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र यांच्या निर्देशानुसार परळी वैजनाथ नगर परिषद सार्वत्रिक निवडणूक–2025 ची प्रक्रिया सुरू आहे. या अंतर्गत मतदान दिनांक 02 डिसेंबर 2025 रोजी सकाळी 7.30 ते सायं. 5.30 या वेळेत पार पडणार आहे. निवडणुकीसाठी नियुक्त क्षेत्रीय अधिकारी, मतदान केंद्रअध्यक्ष व मतदान अधिकारी यांचे पहिले प्रशिक्षण रविवार, दि. 16 नोव्हेंबर 2025 रोजी सकाळी 11.00 वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर, परळी वैजनाथ येथे आयोजित करण्यात आले होते. या प्रशिक्षणामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी अरविंद लाटकर यांनी मार्गदर्शन करतांना म्हणाले की,नगर परिषद सार्वत्रिक निवडणुकीतील मतदान प्रक्रियेचे सर्वांगीण मार्गदर्शन केले, नियुक्त मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी यांना नगर परिषद निवडणूकीत होणारे मतदान साहित्य वितरण केंद्र व स्विकृती केंद्र व त्याचे नियोजन , मतदानाचे आदल्या दिवशी व मतदान दिवशी करावयाची महत्वाची कामे , ईव्हीम, सिलींग , विविध घोषणापत्र , लिफाफे ईत्यादी बाबत सविस्तर मार्गदर्शन केले. निवडणूक संदर्भातील आदर्श आचारसंहितचे पालन करावे असे आवाहन केले. ईव्हीम व साहित्य व विविध अहवाल याबाबतीत सविस्तर माहिती व मार्गदर्शन करून निवडणूकीचे कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच वाचन व पालन करावे, मतदान प्रक्रिया ही निष्पक्ष, पारदर्शक व खुल्या वातावरणात पार पाडण्यास सहाय करुन आपले राष्ट्रीय कर्तव्य व जबाबदारी प्रत्येक अधिकारी व कर्मचाऱ्यांनी पार पाडावी असे आवाहन केले. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करण्याची दक्षता घ्यावी असे सांगितले. नायब तहसीलदार पंडित सुरवसे यांनी नियुक्त अधिकारी व कर्मचारी यांची मतदानाच्या कर्तव्य व अधिकार याबाबत माहिती दिली. कामकाज करताना होणाऱ्या चुका टाळण्याबाबत निवडणूक आयोगाच्या निर्देशाचे सर्वांनीच पालन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. नायब तहसीलदार महेश वाकडे यांनी प्रत्येक कर्मचाऱ्यांनी निकोप आणि आंनददायी वातावरणात राष्ट्रीय कार्यात सहभागी होऊन गोपनीयता भंग होणार नाही याची खबरदारी घेण्याचे सांगितले.

कार्यक्रमास निवडणूक निर्णय अधिकारी श्री. अरविंद लाटकर यांनी मार्गदर्शन केले व आवश्यक सूचना दिल्या. तसेच तहसील कार्यालयाचे नायब तहसीलदार पंडित सुरवसे, नायब तहसीलदार महेश वाकडे, नगर परिषद उपमुख्याधिकारी संतोष रोडे यांसह अन्य अधिकारी उपस्थित होते. या प्रशिक्षणाच्या उपस्थिती सर्व कर्मचारी यांची भोजन व चहापाणी यांची सोय करण्यात आली होती. सदर प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी तहसीलचे ज्ञानोबा मुसळे व इतर अधिकारी कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

नगर परिषद निवडणुकीसाठी केंद्रावरील कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यासाठी आयोजित प्रशिक्षणास 30 कर्मचारी गैरहजर राहिले. त्यांना कारणे दाखवा नोटीस बजावून 48 तासांत खुलासे सादर करण्याचे आदेश निवडणूक निर्णय अधिकारी यांनी दिले आहेत. या खुलाशानंतर दोषींवर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी परळी नगर परिषद निवडणुकीसाठी 563 कर्मचारी नियुक्त करण्यात आलेले आहेत. कर्मचारी निवड करताना निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार करण्यात आली. मात्र,

कर्मचारी अनुपस्थित राहिल्याने निवडणूक कामात अडथळा निर्माण झाला. 30 कर्मचारी प्रशिक्षणाला

अनुपस्थित राहिले. या सर्वांना कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. गैरहजर राहणा-या कर्मचा-यांना खुलासा करण्यास बजावले आहे. योग्य कारणाशिवाय गैरहजर राहणा-या कर्मचा-यांवर अधिनियम महाराष्ट्र नगरपरिषद व नगर पंचायत व औद्यगिक नागरी अधिनियम 1965 अंतर्गत महाराष्ट्र नगर पालिका निवडणूक अधिनियम 1966 मधील नियम 9 अन्वये कारवाई करण्यात येणार आहे.

---

'शब्द आणि माणुसकी—दोन्ही समान मोठी': निवडणुकीत अनेक आश्वासने दिली जातात, पण काकाजींनी त्यांच्या कारभारात नेहमीच शब्द आणि माणुसकी यांना समान महत्त्व दिले. त्यांच्या वागणुकीतील याच खरी माणुसकी नागरिकांनी अनुभवली आहे.

'शब्द कधीच बदलला नाही': त्यांच्या राजकीय प्रवासात अनेक चढ-उतार आले, पण त्यांचे 'वचन' कधीच बदलले नाही. त्यांचे हे नैतिक अधिष्ठान तरुण पिढीसाठी एक आदर्श ठरले आहे.

'शांत, पण अढळ विश्वास': आजचे राजकारण आवाजांनी भरले असताना, नंदकिशोरजी काकाजी 'विश्वासाचा' एक शांत आणि स्थिर आवाज म्हणून उभे राहिले. नागरिकांनी कोणताही गोंधळ न करता, त्यांच्यावर शांतपणे आपला विश्वास दाखवला.

'वचन निभावताना माणुसकीची जाणीव': निव्वळ आश्वासन न देता, प्रत्येक वचन निभावताना त्यांनी 'माणुसकीची जाणीव' करून दिली. याच कारणामुळे त्यांचे स्थान लोकांच्या मनात 'विशेष' आहे.

निष्कर्ष: राजकारण येतं-जातं, पण नंदकिशोरजी काकाजींचा स्वभाव, त्यांचा शब्द आणि त्यांची माया अंबेजोगाईकरांच्या मनात कायम राहणारी एक 'अमानत' आहे. या निवडणुकीत येणाऱ्या काळात मिळणारा विजय केवळ निवडणुकीतील नाही, तर त्यांच्या नेतृत्वातील नैतिक मूल्यांचा विजय असेल , असे बोलले जात आहे.

---

फडकेल.महाबळेश्वरमधील अनेक विकासकामांना माझ्या मुख्यमंत्रिपदाच्या कार्यकाळात गती मिळाली आहे. जिल्ह्याच्या विकास कामांमध्ये यापुढेही सरकार कोणतीही कसर ठेवणार नाही. माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ करण्याचे काम मी नक्कीच करेन. या भागातील विकासासाठी कुठेही पैशांची कमतरता भासू देणार नाही, असा शब्दही एकनाथ शिंदेंनी दिलाआगामी महापालिका, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका आपल्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. सर्वांनी एकजुटीने पुढील लढाईत उतरून भगवा फडकवण्याचे काम करावे, असे आवाहनही शिंदे यांनी केले.या वेळी पालकमंत्री शंभूराज देसाई, जिल्हा संपर्कप्रमुख शरद कणसे, जिल्हाप्रमुख रणजितसिंह भोसले, विधानसभा प्रमुख बबन शिंदे आदी उपस्थित होते. यावेळी सुभाष कारंडे, यशराज भोसले, संजय मोरे, अजित सकपाळ, लक्ष्मी मालुसरे, संगीता गोंदकर यांच्यासह शेकडो पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्त्यांचे शिवसेनेत स्वागत करून त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या..

## पान 4 वरुन

जागेचा प्रश्न,नाट्यगृह उभारणीसह अनेक विकासकामे पुर्णत्वाकडे घेवुन जाणार असल्याचे त्यांनी सांगीतले. या पत्रकार परिषदेला सुंदरराव सोळंके सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन जयसिंग सोळंके,माजी नगराध्यक्ष नासेर खॉ पठाण, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जयदत्त नरवडे, तालुकाध्यक्ष संभाजी शेजुळ, खलील पटेल, कल्याण आबुज, डॉ.वसिम मनसबदार,अच्युत लाटे यांची उपस्थिती होती.

- चौकट-

-

या नावांची केली घोषणा

राष्ट्रवादी काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे ना.मा.प्रा.महिला राखीव उमेदवार निरोनिसा खलील आत्तार पटेल हे तर प्रभाग 1 मध्ये रेखा सरोदे,मालती पाठक,प्रभाग 2 मध्ये रत्नमाला राकेश साळवे,शेख इम्रान, प्रभाग 3 मध्ये राज सय्यद नूर,पठाण नाजीया जुनेदखान,प्रभाग 4 मध्ये नवनाथ गायकवाड, कलावती फरके, प्रभाग 5 मध्ये मनिषा रेदासनी, राहुल लंगडे, प्रभाग 6 लता लाटे, शेख मजीद, प्रभाग 7 मध्ये वैशाली प्रशांत शेटे,विजय शिंदे, प्रभाग 8 मध्ये यास्मिन तांबोळी, शेख तौफिक, प्रभाग 9 मध्ये मोसिन जलील बागवान, सुनीता प्रल्हाद होके, प्रभाग 10 मध्ये राधिका घाडगे,दिनकर होके,प्रभाग 11 मध्ये कोमल वारकड,मतीन शेख,प्रभाग 12 मध्ये उषा बनसोडे, सय्यद रफिक अली, प्रभाग 13 मध्ये सुदामती पोळ, रेहानाबी शेख यांच्या उमेदवाऱ्या जाहीर झाल्या आहेत.

---

प्रशासन अधिक सक्षम व जनसुविधा अधिक प्रभावी होणार असल्याचे त्यांनी सांगितले.यावेळी सरपंच ,देवशाला सुधाकर बनसोडे ,उपसरपंच प्रकाश राठोड ,माजी सरपंच सुदामआप्पा मुंडे ,ग्रा. प. सदस्य रवी कराड, जयराम मुंडे ,सिद्धार्थ बनसोडे ,रमेश राठोड, विसुआबा मुंडे ,विश्वनाथ मुंडे ,प्रशांतभैय्या कराड, वैजनाथ कराड, माऊली फड, पांडुरंग कराड सुसेन मुंडे ,लक्ष्मण दिवटे ,बाबुराव राठोड यादी उपस्थित होते

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांनी तर आभार प्रदर्शन सरपंच महोदयांनी केले. उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

---

गेटसमोर उभा करावयाचे होते मात्र तिथे हि जागा नाकारली. या शिवाय विविध महापुरुषांचे स्मारक प्रस्ताव अजूनही 'कायदेशीर अडथळ्यां'त अडकलेले आहेत. राज्यातील अनेक ठिकाणी कार्यकर्त्यांनी काय झाले तरी पुतळा उभारू असा आक्रमक पवित्रा घेतला आहे. माजलगावातील मध्यरात्रीचा धाडसी प्रकार हे त्याचे प्रात्यक्षिकच मानले जात आहे.

---

स्पर्धांसाठी अधिक बळ देणारा ठरला आहे. आगामी काळातही राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करण्याची क्षमता निशिगंधामध्ये असून तिच्याकडून आणखी सुवर्णयशाची अपेक्षा आहे. अशी भावना सर्वांनी व्यक्त केली.

निशिगंधाच्या या यशामागे तिच्या पालकांचे मार्गदर्शन, प्रोत्साहन आणि प्रशिक्षकांची मेहनत मोठी असल्याचेही यावेळी सांगण्यात आले. तिच्या उज्ज्वल भविष्यासाठी सर्वच स्तरांतून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

---

निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस आहे. त्यामुळे योगेश क्षीरसागर हे आता भाजपाच्या चिन्हावर बीड नगरपालिकेची निवडणूक लढणार आहेत. यापूर्वी योगेश क्षीरसागर यांचे वडील डॉ. भारतभूषण क्षीरसागर यांची बीड नगरपालिकेवर गेली कित्येक वर्षे निर्विवाद सत्ता राहिलेली आहे.

भाजपमध्ये प्रवेश केल्यानंतर योगेश क्षीरसागर यांनी प्रतिक्रिया दिली. ते म्हणाले की, "पक्षाचा राजीनामा दिल्यानंतर पंकजा मुंडे आणि मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते भाजपमध्ये प्रवेश करतोय. स्थानिक स्वराज संस्थांच्या निवडणुकीच्या अनुषंगाने आधीपासूनच तयारी करत होतो. आता आपण भाजपच्या कमळ चिन्हावर निवडणूक लढत आहोत. बीड नगरपरिषदेचे जागा महिलेसाठी राखीव आहे. त्यानुसार कमळावर आम्ही निवडणूक लढू. भाजप आणि आमचे कार्यकर्ते एक युनिट म्हणून काम करू."

बीडमध्ये राष्ट्रवादी अजित पवार गटाला सोडचिठ्ठी देताना योगेश क्षीरसागर यांनी पक्षांतर्गत आपली नाराजी बोलून दाखवली. मी माझ्या पक्षाचे काम प्रामाणिकपणे केले. मला विनाकारण विरोध केला गेला. पक्षाचे पदाधिकारी नेमताना मला कुठेही विश्वासात घेण्यात आले नाही. याबाबत पक्षाच्या वरिष्ठांशी देखील बोललो अशी खंत योगेश क्षीरसागर यांनी बोलून दाखवली.

अजित पवारांनी बीड नगर परिषदेची सूत्रं ही गेवराईचे आमदार विजयसिंह पंडित यांच्याकडे दिल्याने योगेश क्षीरसागर नाराज झाले. बाहेरचे लोक बीडमध्ये येऊन वेगवेगळ्या निवडणुकीत प्रयोग करणं कायम बीडकरांनी हाणून पाडले. हा प्रयोग सुद्धा बीडकर हाणून पाडतील, आपला स्वाभिमान जागा ठेवतील असा विश्वास योगेश क्षीरसागर यांनी व्यक्त केला.

---

राजा काळे यांच्या तक्रारीवरुन केज पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे. पोलिस हेड कॉन्स्टेबल राजू वंजारे, सहाय्यक पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली तपास करत आहेत.

---

होणार असून उमेदवारी अर्ज देखील दाखल केले जाणार असल्याची माहिती आमदार विजयसिंह पंडित यांनी दिली आहे. दरम्यान, या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करणे सुरु झाले आहे. उद्या अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख आहे, त्यामुळं राजकीय घडामोडींना वेग आला आहे. दरम्यान, नगरपालिका आणि नगरपंचायतीच्या निवडणुकीसाठी राज्यात 2 डिसेंबरला मतदान होणार आहे. तर 3 डिसेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

---

नावे त्यांच्या मूळ प्रभागापेक्षा भिन्न प्रभागात टाकण्यात आल्यामुळे मतदानाचा मूलभूत अधिकार धोक्यात आला आहे," अशी तक्रार करण्यात आली आहे.

तसेच, "भारतीय नागरिकांच्या संविधानिक मतदानाधिकाराशी छेडछाड होत असून यामागील राजकीय हेतूंची चौकशी करण्यात यावी," अशीही मागणी निवेदनात स्पष्टपणे व्यक्त केली आहे.

यासंदर्भात निवडणूक अधिकाऱ्यांनी तक्रारीची दखल घेत 28 ऑक्टोबर 2025 रोजी स्थळपाहणी आणि सुनावणी घेण्यात येईल, असे आदेशपत्रात नमूद केले आहे. तक्रारीवरील सर्व मुद्द्यांची तटस्थ चौकशी करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल, असेही प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

दरम्यान, समस्येवर तातडीने कारवाई न झाल्यास 19 नोव्हेंबर 2025 रोजी नगरपरिषद कार्यालयासमोर जोरदार धरना आंदोलन करण्याचा इशारा स्थानिक नागरिकांनी दिला आहे. मतदारयादीतील या गोंधळामुळे रामनगर परिसरात संतापाचे वातावरण असून "मतदानाचा हक्क अबाधित ठेवण्यासाठी जलद गतीने दुरुस्ती करावी," अशी नागरिकांची एकमुखी मागणी आहे.

---

सय्यद रफिक व अविनाश बनसोडे हे आहेत. अविनाश बनसोडे व सय्यद रफिक हे दोघेही प्रभाग क्र.12 इस स्थानिक असलेले रहिवाशी, मतदारांच्या दैनंदिन अडचणींपासून सामाजिक कार्यक्रमांपर्यंत या दोघांची सततची उपस्थिती पाहता मतदारांशी त्यांची 'नाळ' घट्ट जुळलेली आहे निवड संभाव्य उमेदवार म्हणून झाल्याने विरोधकांमध्ये मोठी धाकधूक निर्माण झाली आहे. रफिक सय्यद हे प्रथमच निवडणूक रिंगणात उतरत असले तरी अडचणीत सापडलेल्या प्रत्येक गरजवंताला मदतीचा हात देणारे, सामाजिक कार्यात आघाडीवर राहणारे व्यक्तिमत्व म्हणून त्यांची ओळख आहे.

कोणताही स्वार्थ न ठेवता समाजकार्यातून तयार झालेला विश्वास आज त्यांच्या प्रचाराला मोठा आधार मिळत आहे. मतदारांमध्ये लोकप्रतिनिधी असा असावा असे प्रतिमा

तयार करण्यात रफिक सय्यद यांना यश मिळाल्याचे दिसत आहे दुसरीकडे, अविनाश बनसोडे यांना नगरसेवक पदाचा अनुभव, संघटन कौशल्य आणि स्थानिक प्रश्नांवरील पकड या गोष्टी प्रभागातील जनतेला परिचित आहेत. त्यामुळे ही 'जोडी' आता अधिक शक्तीशाली बनली आहे. व राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) चे आमदार प्रकाश सोळंके व युवा

नेतृत्व जयसिंग भैया सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यकर्त्यांची प्रचारफळी सज्ज झाली आहे. दोन्ही उमेदवारांसाठी प्रभावी, नियोजनबद्ध व धोरणात्मक प्रचार राबवण्यासाठी पक्षाची यंत्रणा जोरात कामाला लागली असल्याचे चित्र दिसत आहे.

तर दुसरीकडे विरोधक अजूनही गोंधळात

प्रभाग क्र. 12 मध्ये अद्याप विरोधकांकडून उमेदवार निवडीतील गोंधळ सुरु असताना, अविनाश बन्सोडे आणि सय्यद रफिक यांच्या प्रचार फेयांची संख्या लक्षणीय दिवसाना दिवस वाढताना दिसत आहे. घरोघरी होत असलेल्या भेटी, स्थानिक पातळीवरील संवाद, तरुणांची साथ आणि

कार्यकर्त्यांच्या नियोजनबद्ध मोहिमा या सर्वांमुळे या जोडीचा प्रचार रंगतदार टप्प्यात दाखल झाला आहे. आ. दादा व भैयांचे मजबूत पाठबळ निकालावर ठसा उमटवणारा घटक ? आ. प्रकाश सोळंके यांची संघटनशैली, कार्यकर्त्यांवरील मजबूत पकड आणि जयसिंग भैयांची जनसंपर्कातील ओळख या दोन्हींचा एकत्रित परिणाम अविनाश बन्सोडे सय्यद रफिक यांच्या उमेदवारीसाठी निर्णायक ठरणार आहे. सध्याच्या परिस्थितीकडे पाहता प्रभाग क्र. 12 मध्ये अविनाश बनसोडे सय्यद रफिक ही जोडी निवडणीच्या प्रचारात प्रभावी आघाडी घेताना दिसत आहे..

---

लागल्या आणि त्यातून स्पार्किंग होत असल्याने आसपासच्या नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले. सुमारे रात्री 12.30 हि घटना घडली होती. साळेगाव येथील विद्युत उपकेंद्राजवळून केज–कळंब महामार्ग क्र. 548 -सीवरून ऊस भरलेली ट्रॉली गंगामाऊली साखर कारखान्याकडे जात होती. त्यावेळी ट्रॅक्टरला ट्रॉली जोडण्यासाठी वापरली जाणारी कनेक्टिंग पीन अचानक तुटली, आणि नियंत्रण सुटलेली ट्रॉली थेट रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या वीज वाहक खांबावर आदळली. धक्का इतका जोरदार होता की विजेचा खांब क्षणात तुटून रस्त्यावर कोसळला आणि ट्रॉली पलटी झाली. अपघातानंतर पडलेल्या तारांमुळे काही क्षण परिसरात धोकादायक स्थिती निर्माण झाली. तारा एकमेकींना चिकटल्याने मोठ्या प्रमाणावर स्पार्किंग होत होती. सुदैवाची गोष्ट म्हणजे अपघाताच्या वेळी आसपास कोणीही नव्हते, तसेच ट्रॅक्टर चालकही सुरक्षित होता. त्यामुळे मोठी जीवितहानी टळली. मात्र या अपघातामुळे साळेगावसह आसपासच्या गावांचा वीजपुरवठा तत्काळ बंद करण्यात आला.


---

# 'रेवडी 'देवीचा विजय !

देशाच्या लोकसंख्येच्या साधारण 10 टक्के जनता एकट्या बिहार या राज्यात निवास करते. म्हणजे 13 कोटींहून अधिक नागरिक या एका राज्यात आहेत. या नागरिकांचे सरासरी दरडोई वार्षिक उत्पन्न आहे फक्त 66 हजार रुपये इतके. देशाच्या सरासरी दरडोई उत्पन्नाच्या एकतृतीयांशहून कमी. देशातील आणि बऱ्याचदा जगातील कोणत्याही आस्थापनांत बिहारी मजूर/ कर्मचारी नसणे फारच दुर्मीळ. इतकेच काय आपल्या सर्व राज्यांतील शेतांवर बिहारी मजूर राबताना दिसतात. या बिहारेतर राज्यांतील शेतमजुरांच्या तुलनेत बिहारमधील शेतांवर राबणाऱ्या मजुरांची कमाई खूपच कमी आहे. कारण बिहारमधील शेतीची उत्पादकता अन्य राज्यांतील शेतीपेक्षा फारच कमी आहे. तसेच खुद्द बिहार राज्यात काम करु इच्छिणाऱ्या तरुणांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. कारण त्या राज्यातील जनतेच्या हातास काम नाही. म्हणजे बिहारींना स्थलांतराखेरीज पर्याय नाही. कारण शेती नाही, व्यापार नाही आणि उद्योगही नाही. देशातील एकंदर कारखानदारीपैकी एक टक्का इतके कारखानेही बिहारात नाहीत. तेव्हा अशा राज्यांतील महिलांस निवडणुकीच्या तोंडावर दहा हजार रुपयांची 'भाऊबीज' दस्तुरखुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडूनच दिली जात असेल तर त्या निवडणुकीचा निकाल शुक्रवारी लागला त्यापेक्षा वेगळा लागणे असंभव. पंतप्रधानांच्या या घोषणेस विरोधी आघाडीचे तेजस्वी यादव यांनी 'हर घर सरकारी नौकरी' वगैरेने प्रत्युत्तर देण्याचा प्रयत्न केला. पण झाडावरील दोन फळांपेक्षा हातातील एक फळ अधिक मोलाचे हे सामान्य बिहारींनी ताडले आणि विद्यमान भाजप/ नितीश कुमार आघाडीच्या बाजूने कौल दिला. या विजयासाठी भाजपचे अभिनंदन.बिहार जिंकण्याची मजा काही औरच. बिहारी बंधूंइतके राजकीयीकरण अन्यत्र कोठेही आढळणार नाही. जेथील नागरिकांत चर्चेत प्राधान्याने राजकारण असते त्या प्रदेशातील अर्थकारण मागास हे ठरलेलेच. त्यामुळे बिहार आर्थिकदृष्ट्या अप्रगत हे ओघाने आलेच. अशा बिहारींस इतकी रोख रक्कम घरबसल्या काहीही न करता मिळणार असेल तर ती देणाऱ्यांस त्यांचा मतदुवा मिळेलच मिळेल. तो भरभरून मिळाला असे निवडणूक निकालांवरून दिसते. या विजयात सांग-काम्या, हो-नाम्या निवडणूक आयोगाचा हात किती इत्यादी चर्चेत न शिरता या निकालाचे विश्लेषण आवश्यक ठरते. विशेषत: विरोधी पक्षांस मतदारांनी इतके वाऱ्यावर का सोडले याचा विचार व्हायला हवा.त्यातील एक कारण म्हणजे मुस्लीम-यादव मतांवर तेजस्वी यादव आणि कंपूने दिलेला अतिरिक्त भर. ही 'एम-वाय' आघाडी ही लालू यांच्या पक्षाचा आधार होती हे खरे. त्यामुळे त्या आपल्या मूलाधाराकडे परतण्याचा प्रयत्न त्यांनी केला असेल तर ते एक वेळ समर्थनीय. परंतु त्यांच्या या प्रयत्नांतील हवा भाजपने 'जंगलराज'च्या स्मरणयात्रेने पूर्ण काढून टाकली. लालू आणि चिरंजीवांनी आपल्या मूलाधाराकडे जाणे याचा अर्थ पुन्हा जंगलराज परतणे असा काढला गेला आणि त्याचा परिणाम असा की त्यांना या निवडणुकीत ना यादवांनी फारशी मते दिली ना मुसलमानांनी. लालूंच्या आघाडीतील काँग्रेसपेक्षा ओवैसी यांच्या 'एमआयएम'ला आणि नितीश कुमार यांस बळ देणे मुसलमानांनी पसंत केले. याचा सोयीस्कर अर्थ 'जातीला नव्हे, विकासाला मत' वगैरे सांगून भाजप काढू शकेल. पण तेजस्वी-काँग्रेस यापेक्षा जातीचे राजकारण भाजप आणि नितीश कुमार अधिक परिणामकारकपणे खेळले. जनता विकासावर मतदान करते वगैरे शुद्ध बकवास. ते तसे असते तर रेवडीविरोधात सातत्याने भूमिका घेणाऱ्या पंतप्रधान आणि त्यांच्या पक्षास रेवड्या वाटत फिरावे लागले नसते. हा रेवड्यांचा दौलतजादा कसा अधिकाधिक वाढू लागला आहे ते प्रत्येक निवडणूक दाखवून देते. या दहा हजारी रेवड्यांमुळे या निवडणुकीत महिलांची भरभरून मते सत्ताधारी पक्षाच्या पदरात पडली. हे मतांचे प्रमाण आठ ते 10 टक्के असावे असे वरकरणी दिसते. म्हणजे यापुढे निवडणुका आल्या की सरकारी तिजोऱ्यांचे दरवाजे आणखी सताड उघडणार हे ओघाने आलेच. याचा दुसरा परिणाम म्हणजे विरोधकांच्या यशाची शक्यता अधिकाधिक दुर्मीळ होणे. आताही नितीश कुमार यांच्या रेवड्यांच्या तुलनेत तेजस्वी यादव यांनी अशीच रेवड्यांच्या वर्षावाची हमी मतदारांस देण्याचा प्रयत्न केला. पण ते झाले भविष्य. वर्तमानात सत्ता ज्याच्या हाती असते त्याच्या हाती जामदारखान्याच्या चाव्या असतात. त्यामुळे त्याही आघाडीवर नितीश कुमार आणि भाजप विरोधकांवर लीलया मात करू शकले. या सत्याचा दुसरा अर्थ असा की केवळ निवडणूक आयोगाविरोधात आगपाखड करण्यापुरते एकत्र येऊन विरोधकांस चालणारे नाही. भाजपने राजकारणाचे आयाम पूर्णपणे बदलून टाकलेले आहेत. हा पक्ष वर्षाचे 365 दिवस 24 तास राजकारण करतो. राहुल गांधी यांची 'मला वाटेल तेव्हा' राजकारण ही वृत्ती भाजपच्या अथक परिश्रमासमोर पासंगालाही पुरत नाही. त्यामुळे काँग्रेस पक्षाची वाताहत अव्याहत सुरू असल्याचे बिहार दाखवून देतो. तरीही हा पक्ष भानावर येईल याची शाश्वती नाही. ते भान आणायचे असेल तर प्रथम राहुल गांधी यांना वेणुगोपालादी निष्क्रिय द्वारपालकास रजा द्यावी लागेल. वेणुगोपाल यांच्यासारख्या दरबारी राजकारण्यांची चैन सत्ता असताना ठीक. पण मुळात पक्षाचीच उद्ध्वस्त धर्मशाळा होत असताना आणि मुदलात दरबारच उठलेला असताना या असल्या दरबारी राजकारण्यांस विचारतो कोण? वेणुगोपाल, जयराम रमेश इत्यादी बुद्धिवान दिवाणखान्यातील चर्चेस, इंग्रजी वर्तमानपत्रातील तृतीयपर्णी वैचारिक मांडणीसाठी वगैरे उत्तम. परंतु भाजप देशाचे राजकारण घराघरात, रस्त्यारस्त्यांवर, हिंदी भाषेत नेत असताना दिवाणखानीय चर्चामग्न बुद्धिमान आंग्लभाषिक हे भुईचा

हॅलो बीड
परळी संघर्षनेता
सोमवार दि. 17 नोव्हेंबर 2025


## अंबाजोगाईच्या विकासासाठी नवा 'संकल्प'! ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा 'काकाजीं'सह 'शहर परिवर्तन जनविकास आघाडी'चे 32 उमेदवार रिंगणात!



प्रकाश मुंडे/बीड जिल्हा प्रतिनिधी अंबाजोगाई: आगामी नगरपरिषद निवडणुकीसाठी अंबाजोगाईच्या राजकारणात मोठी उलथापालथ होण्याची चिन्हे आहेत. शहराच्या सर्वांगीण विकासासाठी नवा निर्धार करत 'अंबाजोगाई शहर परिवर्तन जनविकास आघाडी' ने आपले रणशिंग फुंकले आहे.

या आघाडीच्या नेतृत्वाखाली, शहरातील ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा 'काकाजी' यांनी नगराध्यक्ष (Mayor) पदासाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. 'काकाजीं'सह एकूण 32 उमेदवार या निवडणुकीत नशीब आजमावणार आहेत. यामध्ये नगराध्यक्ष पदासाठी एक आणि 15 वॉर्डांमधून नगरसेवक पदांसाठी 31 उमेदवार अर्ज दाखल करणार आहेत, तर काहींनी अर्ज दाखल केले आहेत.

'शहर परिवर्तन जनविकास आघाडी'च्या स्थापनेमागील ध्येय:

ज्येष्ठ समाजसेवक नंदकिशोर मुंदडा 'काकाजीं'नी पुढाकार घेऊन स्थापन केलेल्या या आघाडीचा मुख्य उद्देश हा अंबाजोगाईचा जलद, शाश्वत आणि अपेक्षित विकास घडवून आणणे हा आहे. शहरातील मूलभूत समस्या सोडवणे, प्रशासनात पारदर्शकता आणणे आणि प्रत्येक शहरवासीयाची आकांक्षा पूर्ण करणे हे या आघाडीचे उद्दिष्ट आहे.

नंदकिशोर मुंदडा 'काकाजी' काय म्हणाले?

नगराध्यक्षपदासाठी अर्ज दाखल केल्यानंतर मुंदडा 'काकाजीं'नी आपला निर्धार व्यक्त केला. ते म्हणाले, "अंबाजोगाईला विकासाच्या मार्गावर वेगाने घेऊन जाण्यासाठी एका सक्षम आणि प्रामाणिक नेतृत्वाची गरज आहे. 'परिवर्तन जनविकास आघाडी'च्या माध्यमातून आम्ही शहरवासीयांना स्वच्छ, सुंदर आणि विकसित अंबाजोगाई देण्यास कटिबद्ध आहोत."

## नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रवादीला साथ आणि समर्थन देतील - आ.प्रकाश सोळंके

### ➡ आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत नगराध्यक्ष पदासाठी आतार मेहरुनबी खलील पटेल यांची उमेदवारी जाहीर



माजलगाव / ( अनंत घडशिंगे ) : नगरपालिकेची रणधुमाळी सुरु असुन अजित पवार राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवा-या आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत जाहिर करत नगरपालिका निवडणुकीत माजलगावकर राष्ट्रवादीला साथ आणि समर्थन देतील असा विश्वासही आ.प्रकाश सोळंके यांनी पत्रकार परिषदेत व्यक्त केला.

येथील सुंदरराव सोळंके महाविद्यालयात दि. 15 नोव्हेंबर शनिवार रोजी सायंकाळी 4:00 वाजता आयोजित पत्रकार परिषदेत आ. प्रकाश सोळंके यांनी राष्ट्रवादीच्या नगराध्यक्षपदासाठी आतार मेहरुनबी खलील पटेल (ना.मा.प्रा.महीला राखीव) यांच्यासह 13 प्रभागातील 26 नगरसेवक पदाच्या उमेदवा-या जाहिर केल्या. दरम्यान यावेळी पालिका ताब्यात असतांना शहरात केलेली स्वच्छता, पाणीपुरवठ्यासह विविध विकासकामांचा पाढा त्यांनी वाचला. त्याचबरोबर आगामी काळात पालिका ताब्यात आल्यास निश्चीतच भुमिगत नाल्या, आठवडी बाजाराच्या पान 3 वर

## मोजे लिंबुटा येथे ग्रामपंचायत कार्यालयाचे जेष्ठ नेते फुलचंद कराड यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न




परळी वैजनाथ (प्रतिनिधी):- परळी तालुक्यातील अत्यंत प्रतिष्ठेच्या व राजकीय दृष्ट्या महत्त्वपूर्ण समजली जाणारी लिंबूटा ग्रामपंचायत आहे. गावाच्या प्रशासनिक कामकाजाला आधुनिक दिशा मिळावी या उद्देशाने नव्या ग्रामपंचायत कार्यालय इमारतीचे उद्घाटन भगवान सेनेचे सरसेनापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते फुलचंदभाऊ कराड यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. नव्या इमारतीमुळे ग्रामपंचायतीची दैनंदिन कामे अधिक सुकर, वेगवान व पारदर्शक पद्धतीने होणार असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

उद्घाटन सोहळ्याला सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य तसेच ग्रामस्थ मोठ्या उत्साहात उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी ग्रामविकासाच्या दिशा, शासकीय योजनांचा प्रभावी लाभ व गावच्या सर्वांगीण प्रगतीबाबत मनोगत व्यक्त केले.

उद्घाटन कार्यक्रमानंतर ग्रामस्थांशी संवाद साधताना भगवान सेनेचे सरसेनापती तथा राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे ज्येष्ठ नेते फुलचंदभाऊ कराड यांनी गावाच्या विकासासाठी सर्वतोपरी सहकार्य करण्याची ग्वाही दिली. नवीन कार्यालयाच्या माध्यमातून पान 3 वर

## 'रातोरात' उभारला छत्रपती संभाजी महाराजांचा पुतळा

### ● माजलगाव शहरात एका प्रतिष्ठानने विद्रोही पद्धतीने प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे.



माजलगाव, वृत्तसेवा : कायद्याच्या किचकट प्रक्रियेमुळे महापुरुषांच्या स्मारकांचे प्रस्ताव वर्षानुवर्षे रखडत असताना, माजलगाव शहरात एका प्रतिष्ठानने विद्रोही पद्धतीने प्रशासनाला थेट आव्हान दिले आहे. धर्मवीर छत्रपती संभाजी राजे शौर्य प्रतिष्ठान या संघटनेने शुक्रवारी मध्यरात्री 2 वाजता शहराच्या संभाजी महाराज चौकात रातोरात छत्रपती संभाजी महाराजांचा पूर्णाकृती पुतळा बसवून चौक अक्षरशः दणाणून सोडला. प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळराजे आवारे पाटील यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी जेसीबी, लोखंडी अँगल, तिरंगा आणि फटाक्यांसह नियोजनबद्ध कारवाई केली. पुतळा बसताच जय छत्रपती संभाजी महाराज ! च्या गजराने परिसर दुमदुमला. संपूर्ण प्रक्रिया काही मिनिटांत पार पडली. माजलगावातील महापुरुषांच्या स्मारकाबाबत अनेक मागण्या दशकानुदशके प्रलंबित आहेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा पुतळा 50 वर्षांपासून मागणी प्रलंबित असून लोकनेते सुंदरराव सोळंके स्मारक हे महाविद्यालयाच्या मुख्य पान 3 वर

## *राज्यस्तरीय तलवारबाजी स्पर्धेत आंबेजोगाईच्या निशिगंधा गायकवाडचे सुवर्णयश



अंबाजोगाई ,(प्रतिनिधी):- छत्रपती संभाजीनगर येथे नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय तलवारबाजी स्पर्धेत आंबेजोगाईच्या निशिगंधा नितीन गायकवाड हिने चमकदार कामगिरी करत सुवर्णपदकाची कमान आपल्या नावे केली. सहाय्यक कृषी अधिकारी नितीन गायकवाड यांच्या कन्या असलेल्या निशिगंधाने गेल्या तीन वर्षांपासून सातत्यपूर्ण परिश्रम, कठोर सराव आणि जिद्दीच्या जोरावर हे यश संपादन केले आहे.

या उल्लेखनीय कामगिरीनंतर बीड जिल्हा कृषी विभाग, आंबेजोगाई परिसरातील नागरिक, तसेच तिच्या शाळेतील शिक्षक वर्गाकडून निशिगंधावर कौतुकाचा वर्षाव होत आहे. राज्यस्तरावर मिळालेला हा मान तिला पुढील पान 3 वर

## बीडमध्ये अजितदादांना मोठा धक्का, आमदार संदीप क्षीरसागरांच्या बंधूंनी साथ सोडली, पत्नीसह भाजपमध्ये प्रवेश



बीड : नगरपालिकेच्या निवडणुका जसजशा जवळ येत आहेत तसतसं बीडमधील राजकारणात (Beed Politics) उलथापालथ होत असल्याचं दिसून येतंय. बीडमध्ये राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला (Ajit Pawar NCP) मोठा धक्का बसला आहे. बीडमधील राष्ट्रवादीचे नेते आणि शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर (Sandeep Kshirsagar) यांचे बंधू योगेश क्षीरसागर (Yogesh Kshirsagar) यांनी अजित पवार यांची साथ सोडली असून त्यांनी भाजपाचं कमळ हाती घेतलं आहे. पंकजा मुंडेंच्या उपस्थितीत हा प्रवेश सोहळा पार पडला. योगेश क्षीरसागर आता भाजपच्या चिन्हावर नगरपालिका निवडणूक लढवणार आहेत.

राष्ट्रवादी सोडण्यामागे काही कारणं होती, आता आता मोकळा श्वास घेतल्याची भावना आहे असं योगेश क्षीरसागर म्हणाले. योगेश क्षीरसागर यांनी राष्ट्रवादीची साथ सोडल्याने ऐन निवडणुकीच्या तोंडावर अजित पवारांसाठी हा मोठा धक्का असल्याचं मानलं जातं.

सोमवारी नगरपालिका पान 3 वर

## नांदुरघाट येथील अपघातानंतर मृतदेह केज पोलिस ठाण्यात ठेवून नातेवाईकांचा ठिय्या



केज: तालुक्यातील नांदुरघाट येथे 15 नोव्हेंबर रोजी झालेल्या अपघातात संतोष राजा काळे (वय 38) आणि त्यांचा मुलगा विशाल संतोष काळे गंभीर जखमी झाले होते. अपघातात संतोष काळे यांचा रस्त्यातच मृत्यू झाला, तर त्यांच्या मुलावर अद्याप उपचार सुरु आहेत. दरम्यान, नातेवाईकांनी मृतदेह केज पोलीस ठाण्यात आणून ठिय्या दिला. अखेर त्यांची समजूत काढल्यानंतर मृतदेह कळंबकडे नेण्यात आला. संतप्त नातेवाईकांनी 16 नोव्हेंबर रोजी दुपारी सुमारास मृतदेह केज पोलिस ठाण्यात आणून ठिय्या दिला. पोलिस अधिकारी आणि सामाजिक कार्यकर्त्यांच्या मध्यस्थीने नातेवाईकांची समजूत करून मृतदेह अंत्यविधीसाठी कळंबकडे रवाना करण्यात आला. पोलिस निरीक्षक स्वप्नील उनवणे, पोलिस निरीक्षक इनामदार सहाय्यक पोलिस निरीक्षक महेश क्षीरसागर, सहाय्यक पोलिस निरीक्षक संदीप मांजरमे, पोलिस उपनिरीक्षक उमेश निकम, तसेच पारधी समाजाचे कार्यकर्ते खंडू काळे आणि बारीकराव काळे, प्रा. हनुमंत भोसले, यांनी मध्यस्थी केली. अपघातात बाळू गवळी आणि बापूराव गवळी यांनी मद्याच्या नशेत कार चालवून मोटारसायकलीला धडक दिली होती. संतोष काळे यांचे वडील पान 3 वर

## बालकाने पालकाला शिकवू नये, आमदार विजयसिंह पंडितांचा योगेश क्षीरसागरांना टोला, म्हणाले, पाठीत बालकानं पाठीत खंजीर खुपसण्याचे काम केलं




Beed : नगरपालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर बीडमधील राजकारणात (Beed Politics) उलथापालथ होत असल्याचं दिसून येतंय. बीडमध्ये राष्ट्रवादीच्या अजित पवार गटाला (Ajit Pawar NCP) मोठा धक्का बसला आहे. बीडमधील राष्ट्रवादीचे नेते आणि शरद पवार गटाचे आमदार संदीप क्षीरसागर (Sandeep Kshirsagar) यांचे बंधू योगेश क्षीरसागर (Yogesh Kshirsagar) यांनी अजित पवार यांची साथ सोडली असून त्यांनी भाजपाचं कमळ (BJP Join) हाती घेतलं आहे. यावरुन राष्ट्रवादीचे आमदार विजयसिंह पंडित ( MLA Vijaysinh Pandit) यांनी योगेश क्षीरसागर यांच्यावर टीका केलीय. बालकाने पालकाला शिकवण्याची गरज नाही, एखादा बालक दादांना ज्ञान देतो हे हास्यास्पद असल्याचा टोला देखील पंडीत यांना लगावला आहे योगेश क्षीरसागर यांच्या टीकेला विजयसिंह पंडित यांनी प्रत्युत्तर दिले आहे. बालकाने पालकाला शिकवण्याची गरज नाही एखादा बालक दादांना ज्ञान देतो हे हास्यास्पद असल्याचे म्हणत पंडितांनी खोचक टीका केली. राष्ट्रवादीमधील घडी विस्कटलेली नसून त्यांच्या जाण्याने काही फरक पडणार नाही. ही कार्यकर्त्यांची निवडणूक आहे. त्याच कार्यकर्त्यांना खिंडीत गाठून पाठीत खंजीर खुपसण्याचे काम या बालकाने केले आहे. तर त्यांच्या समर्थकांचे राजी दरम्यान, बीड नगर परिषदेसाठी अखेर राष्ट्रवादी अजित पवार गटाचे ठरले आहे. शिंदेंच्या शिवसेनेला आणि मेटेंच्या शिवसंग्राम संघटनेला सोबत घेऊन नगरपालिकेसाठी तीन पक्षांची आघाडी करण्यात आली आहे. नगरपालिकेच्या 52 जागा आणि नगराध्यक्ष पदासाठी सर्व उमेदवार ठरले असून पक्षाकडे यादी पाठवण्यात आली आहे. उद्या यावर शिक्कामोर्तब पान 3 वर

## परळीच्या रामनगरातील मतदार यादी गोंधळावर नागरिक नाराज; निवडणूक अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार



परळी वैजनाथ / प्रतिनिधी परळी नगरपरिषद निवडणुकीच्या तोंडावर रामनगर परिसरातील मतदारयादीत मोठ्या प्रमाणात झालेल्या गोंधळामुळे स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. अनेक वर्षांपासून नियमित मतदान करणाऱ्या मतदारांची नावे अचानक वगळली जाणे, तर काहींची नावे चुकीच्या प्रभागात नोंदवली जाणे, असा गंभीर आरोप नागरिकांनी केला आहे. या संदर्भात निवडणूक निर्णय अधिकारी, नगरपरिषद परळी यांना नागरिकांच्या वतीने लेखी निवेदन सादर करण्यात आले आहे.

निवेदनात नमूद केल्याप्रमाणे, "गेल्या 20-25 वर्षांपासून सातत्याने मतदान करणाऱ्या असंख्य नागरिकांची नावे या निवडणुकीत ग mysteriously वगळण्यात आली आहेत. काही मतदारांची पान 3 वर

## प्रभाग क्र.12 मध्ये राष्ट्रवादीचे दमदार उमेदवार. अविनाश महादेव बन्सोडे, सय्यद रफिक अली. याच्यासाठी. आ. दादा व भैयांनी लावली फील्डिंग



माजलगाव / अनंत घडसिंगे

माजलगाव नगरपालिकेच्या निवडणुकीची रणधुमाळी चहुबाजूंनी रंगत असताना राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित पवार गटाच्या संभाव्य उमेदवारांच्या यादीत प्रभाग क्र. 12 मधून अविनाश बनसोडे व सय्यद रफिक या नावांना मिळालेल्या प्राधान्यामुळे राजकीय

वातावरण अधिकच तापले आहे. आ. प्रकाश सोळंके आणि युवा नेतृत्व जयसिंग भैया सोळंके यांच्या पाठिंब्यामुळे या दोघांची उमेदवारी प्रबळ झाले असून प्रभाग क्र.12 मध्ये काही पक्ष व गटांकडून बाहेरून उमेदवार आयात करण्याचे प्रयत्न सुरू असताना, येथेच जन्मलेल्या वाढलेल्या, स्थानिक पातळीवर सातत्याने

जनसंपर्क ठेवणाऱ्या पान 3 वर

## 25 वर्षांची प्रतीक्षा संपली! काकाजी मुंदडा, आमदार नमितातांईच्या अथक प्रयत्नांमुळे अंबाजोगाईला पहिल्याच प्रयत्नात 2500 घरकुले मंजूर !



प्रकाश मुंडे/ बीड जिल्हा प्रतिनिधी अंबाजोगाई शहरातील गोरगरिबांच्या मालकी हक्कासाठी गेल्या 25 वर्षांपासून प्रलंबित असलेला महत्त्वाचा कागद, म्हणजेच घरकुल लाभासाठी अत्यावश्यक असणारा 'पी टी आर' (मालकी हक्काचा हस्तांतरण दस्त) अखेर अंबाजोगाईतील नागरिकांना प्राप्त झाला आहे. ज्येष्ठ समाजसेवक श्री. नंदकिशोर (काकाजी) मुंदडा आणि आमदार सौ. नमिताताई मुंदडा यांच्या अथक प्रयत्नांना यश आले असून, त्यांनी पहिल्याच प्रयत्नात अंबाजोगाई शहरासाठी तब्बल अडीच हजार घरकुले मंजूर करून घेतली आहेत. पान 3 वर

## केज-कळंब महामार्गावर उसाची ट्रॉली पलटी, वीज खांब तुटून पडला



केज तालुक्यातील साळेगाव येथे 16 नोव्हेंबरच्या मध्यरात्री घडलेल्या अपघातामुळे परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टरच्या ट्रॉलीने अचानक नियंत्रण सुटून विजेच्या खांबाला दिलेल्या धडकेत खांब तुटून रस्त्यावर कोसळला. अपघात एवढा गंभीर होता की विजेच्या तारा थेट जमिनीवर लोंबकळू पान 3 वर